# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२८/०९/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी ११.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हा आपल्या हिरो होंडा स्पेंल्डर काळया रंगाची गाडी क्र. एमएच ३१ डीएन ६५७३ कि. १५,०००/–रू. ची शेतावर जावुन रोडच्या बाजुला मोटार सायकल ठेवुन शेतावर गेला व घरी जाण्यास मोटार सायकल जवळ परत आला असतांनी मो.सा. दिसुन न आल्याने शोध घेतले असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादी रविंद्र सदाशिव टांगले वय ५० वर्ष रा. गोपेवाडा यांचे तक्रारी वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पाटील पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) चाफ्यातील बक–यांची चोरी . :–**

दिनांक २६/०९/२०१६ चे १९.०० ते २७/०९/२०१६ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादीचे व मुरलीधर सव्वालाखे, अनील लिल्हारे रा. मांडेसर यांच्या चाफयात बांधलेल्या लाल पांढ–या काळया रंगाच्या ५ बक–या व २ बकरे असे एकुण कि. ३०,०००/–रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी प्रकाश मांगोजी सव्वालाखे वय ४८ वर्ष रा. मांडेसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) आर्थिक लाभ घेण्याकरीता बनावट कागदपत्र तयार करून शासनाची फसवणुक करण्याचा प्रयत्न केला :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी चे पुर्वी पासुन यातील आरोपीने संजय गांधी वृध्दापन कार्ड बि. पी. एल. योजना या शासकीय योजनेचा आर्थिक लाभ घेण्याकरीता बनावट कागदपत्र तयार करून ते खरे असलेल्याचे दाखवुन फिर्यादी यांचेकडे सादर करून शासनाची फसवणुक करण्याचा प्रयत्न केल्याने असे फिर्यादी धनंजय यशवंत देशमुख वय ४६ वर्ष रा. मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४२०,४६८,४७१,५११ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) महीलेच्या गळयातील तुळशिमाळ ओढुन नेले व मोटार सायकलने पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी ही मजुरीचे काम करुन आपल्या घरी जाण्यास घराचे गेट खोलत असतांना गेट समोर उभ्या असलेल्या २ अनोळखी आरोपी मुला पैकी एकाने तिच्या जवळ येवुन तिच्या गळयातील तुळशिमाळ ओढुन नेली व मंदिराच्या बाजुला उभ्या असलेल्या काळया रंगाचे मोटार सायकल वर बसुन पळुन गेल्याने फिर्यादी इंदुबाई कैलासचंद पशिने वय ५७ वर्ष, रा. खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) **अवैध जुगार अडयांवर धाडी .** :—

दिनांक २७/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, साकोली व पवनी येथील अवैध जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन जुगारातुन असा एकुण कि. ५४१ /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.